11-03-2025-Dai-04_DH_PAN_20_08_2016-3.qxp 03/10/2025 10:41 PM Page 1



## निवडक

### पणजी येथे रविवार 'तालयात्रा'; पद्मश्री पं. सुरेश तळवळकर आणि ११ कलाकारांचा कलाविष्कार





■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. १०** : कला अकादमीच्या दीनानाथ मंगेशकर सभागृहात ताल, गायन व नृत्याचा एक अद्भुत अविष्कार अनुभवायची संधी रविवार दि. १६ रोजी सकाळी १० वाजत गोमंतकीय रसिकांना मिळणार आहे. जगप्रसिद्ध तबला गुरू आणि तालयोगी पंडित सुरेश तळवळकर यांच्या असामान्य प्रतिभेचे हे भव्य आणि अप्रतिम साकार रूप आहे. ताल यात्रा हे गायन, वाद्य आणि नृत्य यांचा अत्यंत सुरेख संगम आहे. भारतमुनींच्या नाट्य शास्त्रात संगीताची व्याख्या जशी दिली आहे – गीतं, वाद्यं तथा नृत्यं, त्रयं संगीतमुच्यते – त्याच परिपूर्णतेने हे सादर होते. जगप्रसिद्ध तबला वादक पद्मविभूषण उस्ताद झाकिर हुस्सेन यांच्या स्मृतीस वाहिलेला हा खास कार्यक्रम पणजी येथील स्वस्तिक संस्थेने आयोजित केला आहे.
तालयात्रेमध्ये जबला, पखावज, पाश्चात्य ड्रम्स, कॅजोन, हार्मोनियम, शास्त्रीय गायन आणि कथ्थक नृत्य यांचा समावेश आहे. पंडितजींची असामान्य संगीतातली जाण आणि त्यांचे मंत्रमुग्ध करणारे सादरीकरण प्रेक्षकांना मोहून टाकते. या कार्यक्रमात पंडित सुरेश तळवळकर स्वतः तबला वादन करणार असून त्यांची कन्या सावनी तळवळकर, त्याचबरोबर त्यांचे शिष्य पुष्कर भागवत, आशय कुलकर्णी, कृष्णा साळुंके, ईशान परांजपे, ऋतुराज हिंगे, अभिषेक भुरूक हे तबला, पखावज व ड्रम साथ करणार आहेत. प्रसिद्ध नृत्य कलाकार निखिल परिहार हे कथ्थक नृत्य सादर करणार आहेत. हा एकुण कार्यक्रम श्रवणीय व नेत्रदीपक असून ताल, सूर आणि नृत्याचा एक अविस्मरणीय आणि अप्रतिम संगम या कार्यक्रमात बघायला मिळतो.
तालयात्रेमध्ये भारतीय तसेच पाश्चात्य तालवाद्यांचा समावेश असला, तरी हा कार्यक्रम फ्यूजन नाही. पाश्चात्य वाद्ये जरी वापरली असली, तरी ती संपूर्णतः भारतीय लय–तालांच्या शास्त्रीय चौकटीत बांधलेली असतात. पंडितजींना तबला वाजवताना, गायन करताना आणि बोलाताना पाहणे हाच एक विस्मयकारक अनुभव असतो. तालयात्रेमधील प्रत्येक रचना संगीताला एका वेगळ्याच उंचीवर नेते. आणि त्याचवेळी त्याची शुद्धता आणि उच्च दर्जा यांचे पालनही केले जाते. त्यामुळेच तालयात्रा हे संगीत विश्वातील एक अनोखे चमत्कार मानले जाते. हा कार्यक्रम सर्व रसिकांना जरी खुला आहे. या कार्यक्रमाच्या निःशुल्क प्रवेश पत्रिका पणजी येथील संजीवन संगीत अकादमीत उपलब्ध आहेत. अधिक माहितीसाठी ९११२३७६०२८ या क्रमांकावर संपर्क साधावा.

---

### साखळीत आजपासून योग प्राणायाम शिबिर

■ टीम दैनिक हेराल्ड

**साखळी, दि. १०** : पतंजली योग समिती सांखळीतर्फे मंगळवार दि. ११ ते शनिवार दि. १५ रोजीपर्यंत सकाळी ५.३० ते ६०३० यावेळेत रवींद्र भवन सांखळी येथे योग प्राणायाम शिबीर आयोजित करण्यात आले आहे .या शिबिराचे उद्‌घाटन बाळकृष्ण नाईक यांच्याहस्ते होणार आहे. या शिबिरात संदेश बाराजणकर, हेमा चोपडेकर, गिरिश परुळेकर व दिलीप नाईक मार्गदर्शन करणार आहेत. या शिबिराला येताना महिलांनी पंजाबी ड्रेस किंवा साडी नसणारी असल्यास पायजमा घालावा. आसन, सतरंजी, वही, पेन, रुमाल, पाण्याची बाटली आणावी. मोबाईल बंद ठेवावा.अधिक माहितीसाठी संतोष भाजे ९५४५१६२४१७, अनिल वेर्णेकर ७९७२४६३८५१, सिद्धी गुणाजी ९८३४८६३०७९ किंवा मनोहर गावस ९८८११५१९७७ यांच्याकडे संपर्क साधावा.

---

### हरमल येथे श्रेयस इलेव्हनची १६ रोजी क्रिकेट स्पर्धा

■ टीम दैनिक हेराल्ड

**हरमल, दि. १०** : मधला वाडा येथील श्रेयस इलेव्हन आयोजित सहा षटकांची हरमल गाव मर्यादित क्रिकेट स्पर्धा रविवार दि. १६ रोजी सकाळपासून भाटले गडेकर मैदानावर खेळविण्यात येईल.
या स्पर्धेतील विजेत्यांना रोख व आकर्षक बक्षिसे देण्यात येईल. सदर स्पर्धेत १६ संघाना प्रवेश देण्यात येईल. त्याशिवाय गावातील वयस्कर माजी खेळाडूची एक मॅच असेल,त्या संघातील खेळाडूंना खास स्मृतिचिन्ह देण्यात येईल. अधिक माहितीसाठी सज्ञन गडेकर ९८२३७१४५४४ यांच्याशी संपर्क साधावा असे कळविले आहे.

# हँडबॉल लीग स्पर्धेत लेझी बॉईज विजेता

## उपविजेतेपद फ्लाईंग हँडबॉलर्स संघ : उत्कृष्ट गोलकीपर श्रेयस मोरूडकर

■ टीम दैनिक हेराल्ड

**पेडणे, दि. १०** : गोवा हँडबॉल अकादमीतर्फे चोपडे येथे आयोजित केलेल्या विद्युत झोतातील हँडबॉल लीग स्पर्धेत लेझी बॉईज विजेता ठरला, त्यांना रोख रु. ८० हजार व आकर्षक चषक प्रदान करण्यात आला. फ्लाईंग हँडबॉलर्स संघाला उपविजेतेपद प्राप्त झाले त्यांना रोख रुपये ६० हजार व आकर्षक चषक प्रदान करण्यात आला.

पार्से पँथर्सला तृतीय स्थान मिळाले. त्यांना रोख ३० हजार व चषक देण्यात आला. फ्रेंड्स हँडबॉलर संघाला २० रुपयाचे चौथे बक्षीस देण्यात आले. स्पर्धेत एकूण ६ संघानी भाग घेतला होता.

याशिवाय उत्कृष्ट गोलकीपर म्हणून श्रेयस मोरूडकर (लेझी बॉईज) उभारता खेळाडू म्हणून साईश वेर्णेकर (फ्लाईंग हँडबॉलर्स) सर्वाधिक गोल केल्याबद्दल वालेरियस फर्नांडिस (लेझी बॉईज) मालिका वीर म्हणून गौरव लखन सिंग तर अंतिम सामन्यातील सामनावीर म्हणून बसवराज एस. पी. (फ्लाईंग हँडबॉलर्स) यांना वैयक्तिक बक्षिसे देण्यात आली.



**चोपडे : हँडबॉल लीग स्पर्धेचा विजेता लेझी बॉईज संघास ताज खान यांच्या हस्ते विजेता चषक व रोख ८० हजाराचे बक्षीस स्वीकारताना. सोबत आगरवाडा चोपडे पंचायतीचे सरपंच हेमंत चोपडेकर, देवेंद्र प्रभुदेसाई, अनंत सावळ व मान्यवर.**

पुणे हँडबॉल अकादमीचे गोविंदा राठोड व वल्लभ गणेशकर यांनी पंच म्हणून काम पाहिले.तसेच मारीअंबी मुल्ला,कौस्तुभ शेट्ये, फ्राझर फर्नांडिस, अलिनो डिसोझा आणि ऋतिक बाबरेकर यांनी त्यांना सहाय्य केले.

बक्षीस वितरण समारंभाला प्रमुख पाहुणे म्हणून उद्योजक ताज खान, सन्माननीय पाहुणे म्हणून आगरवाडा चोपडेचे सरपंच हेमंत चोपडेकर, खास निमंत्रित पाहुणे म्हणून उच्च शिक्षण संचनलयाचे सहाय्यक संचालक सिद्धेश केसरकर, डॉ. मायकल डायस, डॉ. सनी काणेकर, डॉ. क्लिफ्टन फर्नांडिस, शैलेश चोडणकर, गौरेश नाईक, सनी वाझ, महेश गवळी, डॉ. सावियो फर्नांडिस, एकनाथ चोपडेकर, नाझारेथ फर्नांडिस, अमित मोरजकर, केशव बुगडे, तसेच गोवा हँडबॉल अकादमीचे अध्यक्ष देवेंद्र प्रभुदेसाई आदी व्यासपीठावर उपस्थित होते. बक्षीस वितरण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अनंत सावळ यांनी केले. अंशगार फर्नांडिस यांनी आभार मानले.

यावेळी गोवा हँडबॉल लीग स्पर्धेच्या आयोजन समितीतर्फे हँडबॉल खेळाचा प्रसार करणाऱ्या ७ क्रीडा शिक्षकांना मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. त्यात रिचर्ड मास्कारेन्स (होली क्रॉस इन्स्टिट्यूट, कासवली), शुभम साळुंखे (मनोविकास इंग्लिश स्कूल, मडगाव) स्टारन फर्नांडिस (किंग स्कूल, मडगाव), डॉ. एलरॉय पिंटो (सेट जोसेफ वाझ महाविद्यालय, कोर्टालिम) तुषार चोडणकर (श्री दुर्गा हायस्कूल पार्से), जगन्नाथ गडेकर (सिक्रेट हार्ट हायस्कूल पररा), संदेश सावंत (प्रधन्या हायस्कूल देवसू) इत्यादींचा समावेश होता.



**नानोडा : येथील श्री सातेरी केळबाई पुरमार देवीच्या वर्धापनदिनानिमित्त गावकरीकडून श्रींचा कौलप्रसाद घेताना भाविक वर्ग.**

# सातेरी केळबाई पुरमार देवस्थानच्या वर्धापनदिनाची कौलप्रसादाने सांगता

■ टीम दैनिक हेराल्ड

**साळ, दि. १०** : नानोडा – डिचोली येथील ग्राम देवी श्री सातेरी केळबाई पुरमार देवस्थानच्या ३५ व्या वर्धापनदिनानिमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन देवस्थानतर्फे करण्यात आले होते. त्यामध्ये नवचंडी अनुष्ठान, कुंकुमार्चन, तसेच मनोरंजनासाठी पौराणिक नाटके पार्सेकर दशावतारी नाट्यमंडळातर्फे 'भैरी भवानी' नाटक तर कै. बाबी कलिंगण निर्मित कलेश्वर दशावतार नाट्यमंडळ नेरूरतर्फे विधीसंकेत हे नाटकांचे आयोजन करण्यात आले होते. अवसारी कौलप्रसादाने वर्धापनदिनाची सांगता झाली. डिचोली मतदारसंघाचे आमदार डॉ. चंद्रकांत शेट्ये, डिचोली भाजप मंडळ अध्यक्ष डॉ. कौस्तुभ पाटणेकर, संजय शेट्ये, वल्लभ साळकर व इतर कार्यकर्त्यांबरोबर गावच्या ग्रामस्थानी श्रींचे दर्शन घेऊन आशीर्वाद घेतला.

# पाककला स्पर्धेत अपर्णा आवटे, शाहिदा अब्बूनावर प्रथम

■ टीम दैनिक हेराल्ड

**म्हापसा, दि. १०** : आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्ताने इंडियन रेड क्रॉस सोसायटी बार्देश शाखा व फाज हॉउसिंग कॉलनी वेल्फेर असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या बारदेझ तालुका मर्यादित पाक कला स्पर्धेला महिलांचा उत्स्फूत प्रतिसाद लाभला. माडेल थिवी येथील फाज हॉउसिंग कॉलोनीच्या सभागृहात दोन विभागात घेण्यात आलेल्या स्पर्धेत ३० स्पर्धाकांना प्रवेश देण्यात आला होता. यात कोंब काढलेल्या कडधान्या पासून तयार केलेल्या पदार्थात पहिले बक्षीस अपर्णा आवटे हिला मिळाले. तर दुसरे नूतन सावंत, तिसरे बक्षीस रश्मी कदंब हिला मिळाले. उत्तेजनार्थ पहिले बक्षीस सेजल रायकर तर दुसरे मंगल दिवकर यांना मिळाले. साखर, मैदा व दुध न वापरता गोड पदार्थ बनवण्याच्या स्पर्धेत पहिले बक्षीस शाहिदा अब्बूनावर, दुसरे अपर्णा आवटे तर तिसरे बक्षीस लता पुजारी यांना मिळाले. उत्तेजनार्थ पहिले बक्षीस तेजस्वी कामत तर दुसरे उत्तेजनार्थ बक्षीस विजया नाईक यांना मिळाले.



**पाक कला स्पर्धेतील विजेत्यां स्पर्धाकांसोबत व्यासपीठावर बसलेले डावीकडून गौरेश, नीता, डॉ. नूतन, रिचर्ड, सुभाष, रुपाली, ईशान, सलीम व अमोणकर.**

स्पर्धेचे परीक्षण रिचर्ड मेलचीअर व रुपाली शेटये याने केले. दोन्ही परीक्षकांनी स्पर्धाकांना कार्यक्रमात उपयुक्त मार्गदर्शन केले. या वेळी व्यासपीठावर इंडियन रेड क्रॉस सोसायटी बारदेझ शाखेचे अध्यक्ष प्रा. सुभाष कौठणकर, परीक्षक रिचर्ड मेलचिओर, रुपाली शेटये, गौरेश नाईक, डॉ. नूतन बिचोलकर, ईशान उसपकर, सलीम इसानी व नीलम नाईक उपस्थित होते. सर्व मान्यवरांच्या हस्ते विजेत्यांना बक्षिसे देण्यात आली.

स्वागतपर भाषणातून सुभाष कौठणकर यांनी रेड क्रॉस सोसायटीच्या कार्याची माहिती दिली. गौरेश नाईक यांनी आभार मानले तर प्रा. नीता कौठणकर यांनी सूत्रसंचालन केले.

# मोरजीत ऑलिव्ह रिडले समुद्री कासवांच्या संवर्धनावर चर्चासत्र

■ टीम दैनिक हेराल्ड

**हरमल, दि. १०** : मोरजी येथे जागतिक वन्यजीव दिनानिमित्त, विद्या प्रबोधिनी महाविद्यालयाने त्यांच्या निसर्ग क्लबच्या माध्यमातून ऑलिव्ह रिडले समुद्री कासवांच्या संवर्धनावर एक अत्यंत माहितीपूर्ण चर्चासत्राचे आयोजन केले होते. सदर चर्चासत्र हे कासवांच्या घरट्यांचे प्रमुख ठिकाण असलेल्या टेमवाडा – मोरजी येथे आयोजित केले होते.

या कार्यक्रमाचा प्रमुख उद्देश हा सागरी जीवनाचे, विशेषतः धोक्यात आलेल्या ऑलिव्ह रिडले समुद्री कासवांच्या प्रजातींचे जतन करून कासवांच्या आवश्यकतेबद्दल जागरूकता निर्माण करणे हा होता. गोवा सरकारच्या वन विभागातील वन्यजीव आणि पर्यावरण–पर्यटन उत्तर विभाग, मोरजी मरीन रेंज आणि गोवा राज्य हवामान बदल कक्ष यांच्या सहकार्याने हे चर्चासत्र आयोजित करण्यात आले होते.




कार्यक्रमाच्या सुरुवातीला निसर्ग क्लबचे समन्वयक डॉ. उद्धव पोळ यांनी या कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले, त्यांनी मान्यवर पाहुण्यांचे आणि सहभागींचे स्वागत केले. सदर कार्यक्रमास वन आणि पर्यावरण क्षेत्रातील मान्यवर प्रमुख व्यक्ती उपस्थित होत्या. ज्यामध्ये आरएफओ आत्माराम गावस, रेंज फॉरेस्टर सहयोग एस. पेडणेकर, वनरक्षक शिवानंद गावस आणि चंदू नाईक, तसेच वन विभागाचे एव्हलिन डिसिल्वा आणि प्रतीक शेट्ये, उपस्थित होते. तर गोवा राज्य हवामान बदल कक्षाच्या प्रकल्प शास्त्रज्ञ डॉ. अपूर्वा सावंत आणि वैज्ञानिक प्रशासकीय सहाय्यक सुश्री सलोनी काकोडकर यांनीही या कार्यक्रमाला उपस्थिती लावली.

शास्त्रज्ञ डॉ. अपूर्वा सावंत यांनी ही हवामान बदल आणि वन्यजीव संवर्धन यांच्यातील परस्परसंबंधांबद्दल त्यांचे दृष्टिकोन मांडले. त्यांनी समुद्राचे वाढते तापमान, प्रदूषण आणि किनारपट्टी विकासाचा कासवांच्या घरट्यांवरील परिणामांवर चर्चा केली.

उपवनसंरक्षक प्रेम कुमार आर., आयएफएस तसेच या चर्चासत्राच्या आयोजनात सहकार्य केल्याबद्दल एसीएफ परेश परब यांचे आभार मानले. पर्यावरण जागरूकता आणि संवर्धनाला चालना देण्यासाठी सतत मार्गदर्शन आणि पाठिंब्याबद्दल त्यांनी प्राचार्य डॉ. भूषण भावे, उपप्राचार्य आणि वाणिज्य विभागाचे प्रमुख डॉ. उज्वला हंजुनकर आणि गोवा राज्य जैवविविधता मंडळाचे सदस्य सचिव डॉ. प्रदीप सरमोकदम यांचेही आभार मानले.

तसेच रुद्रेश म्हामल यांनी आरएफओ आत्माराम गावस, रेंज फॉरेस्टर सहयोग एस. पेडणेकर, वनरक्षक शिवानंद गावस आणि चंदू नाईक आणि इतर मान्यवर पाहुण्यांसह वन कर्मचाऱ्यांच्या समर्पित टीमचे चर्चासत्रात सहभाग घेतल्याबद्दल आभार मानले.

# विविधरंगी स्पर्धेत मांद्रे संघ विजेते

## उपविजेता मोरजी : मांद्रे मतदारसंघ मर्यादित क्रीडा महोत्सव

■ टीम दैनिक हेराल्ड




**पेडणे, दि. १०** : लाखो रुपयांच्या किमतीची घरात वापरण्यासाठी असलेल्या यंत्रसामुग्रीच्या रूपाने असलेल्या बक्षीस मांद्रे मतदारसंघ मर्यादित वेगवेगळ्या स्पर्धा मांद्रे उदरगत संस्था आणि मांद्रेचे सरपंच जीत आरोलकर यांच्यामर्फत आयोजित केलेल्या विविधरंगी स्पर्धेत मांद्रे संघ विजेता ठरला, तर मोरजी उपविजेते पदावर समाधान मानावे लागले.

मांद्रे उदरगत संस्था आणि मांद्रे चे आमदार जीत आरोलकर यांनी तेमवाडा मोरर्जी क्रीडा मैदानावर महिला दिनाचे औचित्य साधून नारी शक्ती महिला क्रीडा महोत्सवाचे आयोजन केले होते. या महोत्सवात मांद्रे मतदार संघातील केरी तेरेखोल पालये, हरमल, मांद्रे, मोर, आगरवाडा चोपडे, पार्से, तूये आणि वीरनोडा या नऊ गावांमधील महिलांनी २००० पेक्षा जास्त महिलांनी या स्पर्धेत सहभाग दर्शवला. त्या स्पर्धेमध्ये मांद्रे गावातील महिला स्पर्धकांनी चॅम्पियनशिप प्राप्त केली.

मांद्रेचे आमदार जीत आरोलकर यांनी या क्रीडा महोत्सवात रोख रक्कम देण्याऐवजी घरात वापरण्यासाठी उपयुक्त ठरलेल्या फ्रिज, वॉशिंग मशीन, टीव्ही, फ्रिज, कुकर, मिक्सर अशा बक्षीसांची खैरात ठेवली होती. वैयक्तिक पातळीवर अनेक महिलांनी फ्रीज, टीव्ही, वॉशिंग मशीन, मिक्सर, कुकर बक्षीसावर आपले नाव कोरले.

मांद्रे चॅम्पियन ठरलेल्या गटाला एकूण ३२ गुण मिळाले, तर मोरजी गटाला २१ गुण मिळून दुसऱ्या स्थानावर बाजी मारली. तर केरी तृतीय क्रमांकावर चौथ्या स्थानी वीरनोडा पंचायत पाचव्या स्थानी , पार्से, पंचायत त्यानंतर आगरवाडा पालये, हरमल, तूये असे क्रमांक प्राप्त झाले.

लेमन अँड स्पून स्पर्धा – लेमन आणि स्पून स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांकाचे बक्षीस यास्मिन शरीफ मोरजी हिला प्राप्त झाले. तर दुसरे बक्षीस अर्चना हडफडकर मांद्रे यांना तर संजना तळकर यांना तिसरे बक्षीस प्राप्त झाले.

सुईमध्ये दोरा टाकणे – सुईमध्ये डोरा टाकण्याच्या स्पर्धेमध्ये प्रथम बक्षीस गृही कोरगावकर – मांद्रे, दुसरी अमिता नासनोडकर हरमल, तर तिसरे शांती तिळवे– पालये यांना प्राप्त झाले.

सफरचंद खाणे स्पर्धेत – प्रथम बक्षीस सुषमा आगरवडेकर आगरवाडा, दुसरे राखी कौठणकर – केरी आणि तिसरे दीक्षा पालयेकर यांना प्राप्त झाले.

५० मीटर धावणेच्या स्पर्धेमध्ये प्रथम बक्षीस प्रतीक्षा परब विर्नोडा, दुसरे गिरिषा केरकर – केरी, तिसरे – रेश्मा सावंत – मांद्रे यांना प्राप्त झाले.

रिलेश स्पर्धेत प्रथम विर्नोडा, दुसरा मोरजी, तिसरा पार्से.

कबड्डी स्पर्धेत प्रथम मांद्रे, दुसरे मोरजी, तिसरा आगरवाडा. खो खो स्पर्धेत प्रथम केरी, दुसरे पार्से, तिसरा मांद्रे.

रेटक अँड वार स्पर्धेत प्रथम मांद्रे, दुसरे आगरवाडा, तिसरा पार्से आणि केरी विभागून देण्यात आले. अशा विविधरंगी स्पर्धेमधून मांद्रे ही चॅम्पियनशिप ठरली.

बक्षीस वितरण कार्यक्रमाला मांद्रेचे आमदार जीत आरोलकर, मोरजी सरपंच पवन मोरजे, केरी सरपंच धरती नागोजी, तुये सरपंच सुरक्षा नाईक, पार्से माजी उपसरपंच अजित मोरजकर, तुये पंच स्वीटी नाईक हरमल माजी सरपंच संतान फर्नांडिस, पंच अनुपमा मयेकर , मांद्रे माजी सरपंच रोजा उर्फ मिगेल फर्नांडिस, पंच रॉबर्ट फर्नांडिस आदी उपस्थित होते.


# रवींद्र जडेजा ठरला सर्वोत्तम क्षेत्ररक्षक

**दुबई, दि. १०** :

चॅम्पियन्स ट्रॉफीच्या अंतिम सामन्यात न्यूझीलंडविरुद्धच्या सामन्यासाठी टीम इंडियाने रवींद्र जडेजाला सर्वोत्कृष्ट क्षेत्ररक्षक पदक दिले. संघाच्या ड्रेसिंग रूममध्ये क्षेत्ररक्षण प्रशिक्षक टी दिलीप यांनी त्याला पदक प्रदान केले. अंतिम सामन्यात जडेजाने १० षटके गोलंदाजी केली आणि ३० धावा दिल्या आणि एक विकेट घेतली. फलंदाजी करताना तो ९ धावा काढून नाबाद राहिला.

रविवारी झालेल्या चॅम्पियन्स ट्रॉफीच्या अंतिम सामन्यात भारताने न्यूझीलंडचा ४ विकेट्सने पराभव केला. दुबईमध्ये किवी संघाने २५१ धावा केल्या. कर्णधार रोहित शर्माच्या अर्धशतकाच्या मदतीने भारताने ४९ षटकांत लक्ष्य गाठले.

अंतिम सामन्यात जडेजाने एकही झेल घेतला नाही किंवा धावबाद केले. पण त्याची क्षेत्ररक्षणाची पातळी पाहून त्याला हा पुरस्कार देण्यात आला. त्याने अनेक वेळा धावा वाचवल्या आणि चौकार थांबवले आणि न्यूझीलंडच्या फलंदाजांवर दबाव निर्माण केला. २ पॉइंट्समध्ये त्या संधी.



४१ व्या षटकाच्या दुसऱ्या चेंडूवर जडेजाने मायकेल ब्रेसवेलला रनआउट करण्याची संधी निर्माण केली, त्याने बॉलिंग एंडवर थ्रो केला, परंतु गोलंदाज कुलदीपने थ्रो कव्हर केला नाही आणि त्याने संधी गमावली. ४९ व्या षटकात, मिचेल सँटनरने डीप मिडविकेट आणि लाँग–ऑनमधील अंतरावर एक शॉट खेळला, जडेजाने डायव्ह मारला आणि चेंडू सीमारेषेबाहेर जाण्यापासून रोखला आणि २ धावा वाचवल्या.

बीसीसीआयने एक व्हिडिओ शेअर केला आहे, ज्यामध्ये भारताचे क्षेत्ररक्षण प्रशिक्षक टी दिलीप यांनी चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५ च्या विजयानंतर संघाचे कौतुक केले आहे. ते म्हणाले, मला वाटतं जर तुम्ही संपूर्ण स्पर्धेकडे खरोखर पाहिले, तर एक गोष्ट स्पष्ट होते की मैदानावर कोणतेही प्रयत्न कधीही लहान नव्हते आणि आज ते आपल्यासमोर आहे. आम्ही चॅम्पियन आहोत.

रविवारी दुबईमध्ये प्रथम फलंदाजी करताना न्यूझीलंडने ७ गडी बाद २५१ धावा केल्या. भारताने ४९ व्या षटकात ६ गडी गमावून लक्ष्य गाठले. कर्णधार रोहित शर्माने ७६, श्रेयस अय्यरने ४८ आणि केएल राहुलने ३४ धावा केल्या.

गोलंदाजीत कुलदीप यादवने मोठी भूमिका बजावली. त्याने रचिन रवींद्र आणि केन विल्यमसन यांना २ षटकांतच पॅव्हेलियनमध्ये पाठवले. वरुण चक्रवर्तीनेही २ विकेट्स घेतल्या. रवींद्र जडेजाने १० षटकांत फक्त ३० धावा देऊन १ बळी घेतला, त्याने ४९ व्या षटकात विजयी चौकार मारला.

RNI No. GOAMAR/2013/49899 **दैनिक हेराल्ड** वर्ष १३, अंक १८८ **मालक:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., **प्रिंटर:** श्री. वॉल्टर लिगोरिओ डिसोझा, **प्रकाशक:** श्री. वॉल्टर लिगोरिओ डिसोझा, **प्रकाशन स्थळ:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., प्लॉट क्र. एल – १३५, फेज २, वेर्णा औद्योगिक वसाहत, वेर्णा, सालसेत, गोवा, **छपाई स्थळ:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., प्लॉट क्र. एल – १३५, फेज २, वेर्णा औद्योगिक वसाहत, वेर्णा, सालसेत, गोवा. **एडिटर इन चीफ:** श्री. आर. एफ. फर्नांडिस, **संपादक:** श्री. दिनेश वासुदेव केळुस्कर (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी).

RNI No. GOAMAR/2013/49899 **Dainik Herald** Volume 13, Issue 188 **Owner:** Herald Publications Pvt. Ltd., **Printer:** Mr. Walter Ligorio D'Sousa, **Publisher:** Mr. Walter Ligorio D'Sousa,, **Published from:** Herald Publications Pvt. Ltd., Plot No. L - 135, Phase II, Verna Industrial Estate, Verna, Salcete, Goa and **Printed from**: Herald Publications Pvt. Ltd., Plot No. L - 135, Phase II, Verna Industrial Estate, Verna, Salcete, Goa. **Editor in Chief** Mr. R. F. Fernandes, **Editor :** Mr. Dinesh Vasudev Keluskar (Responsible under P.R.B. Act), .